# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन)

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य), एफ/उत्तर विभाग, 3रा मजला, 96 भाऊ दाजी रोड, माटुंगा, मुंबई – 400 019

**क्र. सअ / एफ/उत्तर/ 21172 /घ.क.व्य./ दिनांक- 05.03.2024**

## स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

## जोडपत्रक-4

**विषयः-** मुंबई मनपा एफ/उत्तर विभागाच्या हद्दीतील स्वच्छतेचे स्तर लोक सहभागातून उंचविण्यासाठी प्रायोगिक तत्वावर "स्वच्छता दूत योजना" राबविण्याबाबत.

**संदर्भ -** **1.** MDF/ 5372/ Z-II dt. 02.01.2024
**2.** AE/SWM/ 18571/ FN Dt. 16.01.2024
**3.** AE/SWM/ 19174/ FN Dt. 31.01.2024
**4.** AE/SWM/ 20080/ FN Dt. 15.02.2024

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात रस्त्यावरील पदपथावर व सार्वजनिक ठिकाणी उत्तम दर्जाची स्वच्छता ठेवण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या 24 प्रशासकीय प्रभागात "स्वच्छता दूत योजना" राबविण्याकरीता स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) / प्रस्ताव मागविण्यासाठी अर्ज मागवित आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) सदंर्भात तपशीलवार माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी व स्वच्छता दुतांना सहाय्य अनुदान/मानधन देण्यासाठी, फक्त बेरोजगार सेवा सहकारी (सहकार कायदा 1960 अन्वये नोंदणीकृत) संस्थांची नेमणूक केली जाईल. इच्छुक बेरोजगार सेवा सहकारी संस्थांनी "स्वच्छता दूत योजना" करीता अर्ज पूर्णपणे भरून त्यासोबत संबंधित कागदपत्रे जोडून एफ/उत्तर विभाग कार्यालय, सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.) रुम नं. 38, 96 भाऊ दाजी रोड, माटुंगा मुंबई – 19 यांचेकडे सादर करावे.

स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) अर्ज विक्रीसाठी विभागातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे ठेवण्यात आले आहेत. (अर्जाचे शुल्क रु. 3000/- अधिक GST 18% असे आहे.)

| **पुर्वीचा कालावधी** | | | | **मूदतवाढ कालावधी** |
|---|---|---|---|---|
| दि. 05.01.2024 ते 16.01.2024 पर्यंत | दि. 17.01.2024 ते 31.01.2024 पर्यंत | दि. 01.02.2024 ते 15.02.2024 पर्यंत | दि. 16.02.2024 ते 04.03.2024 पर्यंत | **दि. 05.03.2024 ते 01.04.2024 पर्यंत** |

अर्ज **दिनांक 05.03.2024 ते 01.04.2024 पर्यंत** कार्यालयीन वेळेत शनिवार / रविवार व सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील. **दिनांक 01.04.2024 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत** स्वारस्य अभिव्यक्तीचे अर्ज मोहोरबंद लिफाफा "स्वच्छता दूत योजना" असे लिहून या कार्यालयात सादर करावयाचे आहे. प्राप्त अर्जांची छाननी / पडताळणी करून पात्र संस्थांची यादी संबंधित विभाग कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात येईल.

योजनेत 'स्वच्छता दूत' म्हणून नेमणूक होण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेत कोविड महामारी निमुर्लनाच्या कामात प्रत्यक्ष काम केलेल्या व वैद्यकिय आरोग्य अधिकारी व त्यावरील श्रेणीतील अधिकारी यांनी प्रमाणीत केलेल्या यादीत नाव असल्याबद्दलचा कागदोपत्री पुरावा जोडणे बंधन कारक आहे.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घ.क.व्य)**

**एफ/उत्तर विभाग**